महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १५६ वे | दिनांक : ३१/०५/२०२६ | वार : रविवार

## संभाजीनगर भाजपकडे, नाशिक शिंदेसेनेकडे ? महायुतीचे जागावाटप अंतिम टप्प्यात



**मुंबई :** विधान परिषदेतील १७ जागांसाठी १८ जूनला निवडणूक होत आहे. दोन दिवसांपूर्वी महायुतीची दिल्लीत बैठक झाली. तेथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भाजपतर्फे जागा वाटपात वाटाघाटींचे अधिकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले. सूत्रांनी सांगितले की, महायुतीच्या जागावाटपाचा अंतिम निर्णय शनिवारी दुपारी होऊ शकतो.

भाजप १२, शिंदेसेना ३, राष्ट्रवादी अजित पवार गट २ जागा लढवेल. दिल्लीतील बैठकीत छत्रपती संभाजीनगर आणि नाशिकचा तिढा होता. तो सुटला आहे. संभाजीनगरची जागा पहिल्यांदाच भाजप तर नाशिकची जागा शिंदेसेना लढवण्याची शक्यता आहे. याचप्रमाणे मविआने १५ जागांचे वाटप ठरवले. काँग्रेस ८, उद्धवसेना ४, राष्ट्रवादी शरद पवार गट ३ जागा लढवणार आहे. मविआत नाशिक, नांदेडसाठी रस्सीखेच सुरू आहे.

या निवडणुकीत मविआत उद्धवसेना नव्हे तर काँग्रेस मोठा भाऊ असेल. १५ जागांचे वाटप असे. काँग्रेस : चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा-गोंदिया, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव-बीड-लातूर, नागपूर.उद्धवसेना : रत्नागिरी-सिंधुदुर्ग-रायगड, जळगाव, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर-जालना. शरद पवार गट : पुणे, ठाणे, सांगली-सातारा. (नाशिक, नांदेड प्रलंबित)

भाजप : सोलापूर, अहिल्यानगर, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, भंडारा-गोंदिया, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर-जालना, धाराशिव-लातूर-बीड आणि नागपूर. शिवसेना (शिंदेसेना) : ठाणे, नाशिक आणि यवतमाळ. राष्ट्रवादी अजित पवार गट : पुणे आणि रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग.

महायुतीत सर्व जागांसाठी स्थानिक पातळीवरील नेत्यांत असंतोषाची धग कायम आहे. विशेषतः छत्रपती संभाजीनगरात भाजपचा आग्रह नेतृत्वासाठी डोकेदुखी ठरत आहे. जळगावात मंत्री गुलाबराव पाटील स्वतःच्या मुलासाठी आग्रही आहेत. परभणी-हिंगोलीसाठी अर्जुनराव खोतकरांनी जोर लावल्याने शिंदेसेनेत अस्वस्थता आहे. अर्ज भरण्यासाठी अवघे दोन दिवस शिल्लक असताना, स्थानिकांची नाराजी दूर करण्याचे आव्हान मुख्यमंत्री फडणवीसांपुढे आहे.

## महायुतीत जागांसाठी चुरस; पाटील पुत्रासाठी प्रयत्न, दळवी कन्येचा अर्ज

**मुंबई :** विधान परिषदेच्या १७जागांसाठी पुढील महिन्यात होणाऱ्या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीमधील घटकपक्षांत उमेदवारीसाठी जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे. जळगावची जागा भाजपला सुटल्याचे स्पष्ट होताच शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील आपल्या मुलासाठी उमेदवारी मिळवण्याच्या प्रयत्नात तातडीने मुंबईला दाखल झाले. कोकणातील एकमेव जागेवरूनही शिवसेनेतच संघर्ष पेटला आहे. येथे आमदार भरत गोगावले आणि महेंद्र दळवी हे दोन्ही नेते आपापल्या मुलांसाठी तिकीट मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. सोलापुरातही भाजपचे शहाजी पवार यांच्या नावाची चर्चा सुरू झाल्याने तेथेही रणकंदन माजण्याची शक्यता आहे.

विधान परिषदेच्या १७ जागांसाठी पुढील महिन्यात १८ तारखेला निवडणूक होणार आहे. महायुतीच्या घटकपक्षांत सध्या कोणती जागा कोण लढवणार? याविषयी चर्चा सुरू आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजप १७ पैकी सर्वाधिक ११ जागा लढवणार असून, उर्वरित ६ जागांपैकी ४ जागा शिवसेना, तर २ जागा राष्ट्रवादी काँग्रेस लढवण्याची शक्यता आहे. पण त्यावर अद्याप अंतिम शिक्कामोर्तब झाले नाही. यामुळे महायुतीतील घटक पक्षांच्या नेत्यांची उमेदवारीसाठीची धडपड अधिकच तीव्र बनली आहे. या प्रकारामुळे पक्षश्रेष्ठींवरील दबावही वाढत चालला आहे.

## सांगली-सातारा विधान परिषदेत मोठा ट्विस्ट; शिंदेसेनेच्या नेत्याचे बंड



**सांगली :** राज्यात विधानपरिषद निवडणुकीच्या जागावाटपावरून महायुतीमध्ये अद्याप खलबतं सुरू असतानाच, सांगली-सातारा मतदारसंघात महायुतीला मोठा धक्का बसला आहे. जागावाटपाचा अंतिम निर्णय होण्यापूर्वीच शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक तानाजीराव पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल करत बंडाचे निशाण फडकवले आहे. या जागेवर भाजपाचा दावा असताना शिंदेंच्या नेत्याने अर्ज भरल्यामुळे महायुतीत बिघाड होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

तानाजीराव पाटील यांनी सांगली आणि सातारा विधानपरिषद मतदारसंघासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज सादर केला. यावेळी आटपाडी तालुक्यातील शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जोरदार शक्तीप्रदर्शन केले. ही जागा महायुतीत भाजपाच्या वाट्याला जाणे अपेक्षित असताना, पाटील यांनी शिवसेनेच्या वतीने अर्ज भरल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

विधान परिषदेसाठी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना तानाजीराव पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "मी दिवंगत नेते अनिल बाबर यांच्यासोबत 30-32 वर्षे राजकारण आणि समाजकारणात काम केले आहे. या काळात सांगली आणि सातारा जिल्ह्यात जीवाला जीव देणारे मित्र कमावले आहेत. "दोन्ही जिल्ह्यातील कार्यकर्ते, नगरसेवक आणि जिल्हा परिषद सदस्यांच्या आग्रहाखातर मी हा निर्णय घेतला आहे. आमदार सुहास बाबर आणि मंत्री शंभूराज देसाई यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या जागेसाठी अधिकृत उमेदवारीची मागणी केली आहे," असे तानाजीराव पाटील म्हणालेत.

राजकारणात आपले कोणाशीही शत्रुत्व नसून सर्व पक्षांतील नेत्यांशी मित्रत्वाचे संबंध आहेत, त्यामुळे सर्वच पक्षांचे लोक आपल्याला मदत करतील, असा विश्वास तानाजीराव पाटील यांनी व्यक्त केला. "दहा सूचकांच्या माध्यमातून मी अर्ज भरला असून, तो मागे घेण्यासाठी नाही तर निवडणूक लढवण्यासाठीच भरला आहे," असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

छत्रपती संभाजीनगर आणि नाशिकच्या जागांवरून भाजपा आणि शिवसेनेमध्ये आधीच वादाचे गुऱ्हाळ सुरू आहे. त्यातच सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसनेही किमान तीन जागांची मागणी केली आहे. आता सांगली-साताऱ्यात तानाजीराव पाटील यांनी थेट अर्ज भरल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावर काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महायुतीचे जागावाटप अद्याप फायनल नसताना झालेल्या या बंडाची चर्चा सध्या राज्यभर रंगली आहे.

विधान परिषदेच्या १७जागांसाठी पुढील महिन्यात होणाऱ्या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीमधील घटकपक्षांत उमेदवारीसाठी जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे. जळगावची जागा भाजपला सुटल्याचे स्पष्ट होताच शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील आपल्या मुलासाठी उमेदवारी मिळवण्याच्या प्रयत्नात तातडीने मुंबईला दाखल झाले. कोकणातील एकमेव जागेवरूनही शिवसेनेतच संघर्ष पेटला आहे. येथे आमदार भरत गोगावले आणि महेंद्र दळवी हे दोन्ही नेते आपापल्या मुलांसाठी तिकीट मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. सोलापुरातही भाजपचे शहाजी पवार यांच्या नावाची चर्चा सुरू झाल्याने तेथेही रणकंदन माजण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३१ मे २०२६


## महात्मा फुले, सावित्रीबाई, शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा संदेश घराघरांत पोहोचविण्याचा उपक्रम




**बुलढाणा (महेश मुंढे) :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे राज्यभर फिरत असलेल्या भव्य चित्ररथाचे गुरुवारी किनगावराजा येथे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. चित्ररथ गावात दाखल होताच ग्रामस्थांनी जल्लोषपूर्ण वातावरणात स्वागत करून महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले.माजी मंत्री छगन भुजबळ यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या या विशेष चित्ररथामध्ये क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आकर्षक प्रतिकृती उभारण्यात आल्या आहेत. याशिवाय पुण्यातील ऐतिहासिक भिडे वाडा आणि देशातील मुलींच्या पहिल्या शाळेची हुबेहूब प्रतिकृती साकारण्यात आल्याने नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण, स्त्री-सक्षमीकरण, सामाजिक समता आणि अस्पृश्यता निर्मूलनासाठी केलेले कार्य समाजापर्यंत पोहोचावे तसेच त्यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार व्हावा, या उद्देशाने हा चित्ररथ राज्यभर फिरविण्यात येत आहे. चित्ररथाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या जीवनकार्याची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याबरोबरच युवकांमध्ये सामाजिक जाणीवा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.चित्ररथाच्या स्वागतावेळी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थांनी घोषणाबाजी करत महात्मा फुले यांच्या कार्याला अभिवादन केले. अनेकांनी चित्ररथासमोर छायाचित्रे काढून या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी उपक्रमाचे स्वागत केले.यावेळी समता परिषदेचे वसंतराव मगर, उत्तमराव झोरे, शिवाजीराव काळुसे, सर्जेराव झोरे, राधाकिसन हरकळ, सुनील झोरे, प्रमोद काकड, सखाराम हरकळ, गणेश काकड, दिनेश झोरे, ज्ञानेश्वर कायंदे, दीपक साळवे, प्रसाद कुलकर्णी, सचिन मांटे, मधुकर साळवे, राजू राजे, गजानन वानखेडे, विनोद हरकळ, शिवानंद मुंढे, सर्जेराव गोरे, भीमराव खाडे, महेश वल्टे, विजय इंगळे, निलेश हरकळ, सुरज लिंबेकर, गजानन हरकळ, संतोष काकड, उद्धव झोरे, समाधान मुंढे, अजय जाधव, पवन झोरे, वैभव हरकळ, संतोष झोरे, सलीम शेख, शिवाजी हरकळ, प्रशांत झोरे, नंदकिशोर हरकळ, बालू केवट, सुरज जाधव यांच्यासह शेकडो ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.फोटोच्या खाली लिहिण्याच्या ओळी : किनगावराजा येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त आलेल्या चित्ररथाचे स्वागत करताना ग्रामस्थ

## उन्हाळ्याची सुट्टी

आला आला मे महिना
लागली उन्हाळ्याची सुट्टी
आंब्यासोबत करूया
रोज रोज गट्टी

खाण्यापिण्याचा करूया
आईजवळ हट्ट
जेवतांना पिऊया
आंब्याचा रस घट्ट

जमा केलेल्या पैशाचा
गल्ला फोडायचा आता
कार्टून शो पाहायचा
आईस्क्रीम खाता खाता

अजिबात नको आता
अभ्यासाचे नाव
झुक झुक गाडीत बसून
गाठायचा मामाचा गाव

आजी सांगेन मग
गोष्टी छान छान
ऐकणार आम्ही
हरपून देहभान



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## निरगुडी बु गावामध्ये पाण्याचा बेसुमार अपव्यय, नागरिक चिंतेत




**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यातील निरगुडी बु गावामध्ये पाण्याचा बेसुमार अपव्यय चालू आहे.चालू वर्षी उन्हाळ्याची भीषणता दिवसेंदिवस वाढत चालली असून,निरगुडी बु एकाच गावात अर्धे गाव उपाशी तर अर्धे गाव तुपाशी अशी गत झाली आहे जे नागरिक गाळ्याकडे राहतात त्यांना पाण्याची झळ सोसावी लागत आहे. त्याचबरोबर ठाकरवाडी देवठाणवाडी व काही भागांत तीव्र पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे. एकीकडे ठाकरवाडीतील भागात पाण्यासाठी महिलांना दोनशे ते चारशे मी भटकंती करावी लागत आहे, तर दुसरीकडे निरगुडी बु गावामध्ये पाण्याचा बेसुमार अपव्यय होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.एकीकडे आम्हाला दोन महिन्यातून एकदा पाणी मिळते आणि निरगुडी बु गावात रस्त्यावर,बाथरुम मध्ये पाणी वाहून जाते, गटार नाले भरुन वाहतात"पिण्याच्या पाण्याचा वापर अशा कामांसाठी केला जात असल्यामुळे हजारो लिटर पाणी दररोज नाल्यांमध्ये वाहून जात आहे.वाढत्या तापमानामुळे आधीच विहीरीचा पाणीसाठा खालावला असताना, अशा प्रकारे होणारा पाण्याचा अपव्यय चिंतेचा विषय ठरत आहे. अशी संतप्त प्रतिक्रिया एका नागरिकाने दिली.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३१ मे २०२६

# अहिल्यादेवी होळकर : युगप्रवर्तक विचारांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व

**स**त्तेला जनसेवेचे अधिष्ठान प्राप्त करून देणाऱ्या इतिहासातील एक प्रभावीशाली व्यक्तिमत्व म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ज्यांचे नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले गेले. खंडेरावांची पत्नी, मल्हाररावांची सून आणि माळव्याची लोकमाता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यादेवी केवळ एक राणी नव्हत्या, तर त्या एक संस्था होत्या. अहिल्यादेवी होळकर या व्यक्ती नसून प्रणाली होत्या. त्यांनी सत्ता उपभोगण्याचे साधन न ठेवता, ती सेवेची संस्था बनविली. जेव्हा आपण एखाद्या व्यक्तीला संस्था म्हणतो, तेव्हा त्याचा अर्थ असा होतो की, त्या व्यक्तीने घालून दिलेल्या परंपरा, नैतिक मूल्ये आणि काम करण्याची पद्धत ही काळाच्या मर्यादा ओलांडून आजही मार्गदर्शक ठरतात. ज्या काळात स्त्रियांना चार भिंतींच्या आत बंदिस्त ठेवले जायचे, त्या काळात त्यांनी आपल्या अदम्य धैर्याने आणि कुशल प्रशासनाने १८ व्या शतकातील भारताला नवी दिशा आणि मार्ग दाखवला. न्याय, लोककल्याण आणि संस्कृती संवर्धनाचे त्यांचे कार्य म्हणजे आजही आधुनिक प्रशासनासाठी एक आदर्श वस्तुपाठ आहे. शस्त्रे न वापरताही ज्यांनी शत्रू जिंकले, संस्कारांच्या बळावर राज्याचे रक्षण केले, त्या युगप्रवर्तक अहिल्यादेवी होळकर होत.भारतीय इतिहासात ज्या मोजक्या राज्यकर्त्यांनी, त्यात महिला राज्यकर्त्या म्हणून आपल्या कार्याचा ठसा उमटवला, त्यामध्ये अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अद्वितीय स्वरूपाचे आहे. त्या केवळ एक आदर्श शासक किंवा दानशूर राणी नव्हत्या, तर न्यायप्रिय, लोककल्याणकारी, दूरदर्शी आणि मूल्यनिष्ठ नेतृत्वाचे मूर्तिमंत उदाहरण होत्या. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित न राहता आजच्या लोकशाही, प्रशासन, सामाजिक न्याय आणि स्त्री-सशक्तीकरणाच्या संकल्पनांमध्येही प्रकर्षाने जाणवतो. न्यायाचे प्रतीक, लोकमाता अहिल्यादेवी, कुशल प्रशासन, लोककल्याण, सुराज्य, साधे जीवन, उच्च विचार, लोकराज्य निर्धार, प्रजेच्या कल्याण, समर्पित जीवन, युगप्रवर्तक प्रेरणा म्हणजे अहिल्यादेवी होळकर. संस्कृतीचे जतन आणि जनसामान्यांचे कल्याण, यातच खऱ्या शासकाची ओळख असते. अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर (अहिल्यानगर) जिल्ह्यातील चौंडी येथे साधारण कुटुंबात झाला. अहिल्यादेवी आपल्या विलक्षण बुद्धिमत्ता, संवेदनशीलता, धैर्य, धाडसी, स्वाभिमानी आणि कर्तृत्वाच्या बळावर इतिहासात अजरामर स्थान मिळवले. पती खंडेराव होळकर आणि सासरे मल्हारराव होळकर यांच्या निधनानंतर त्यांनी अत्यंत धैर्याने राज्यकारभाराची धुरा सांभाळली आणि माळवा प्रांताला समृद्धीच्या शिखरावर नेले.O लोकाभिमुख आणि उत्तरदायी प्रशासनाचा आदर्श : अहिल्यादेवींनी सत्ता ही प्रजेच्या कल्याणासाठी असते, ही भूमिका स्वीकारली होती. माळव्याच्या राज्यकारभाराची सूत्रे वयाच्या ४२ व्या वर्षी सन १७६७ ते १७९५ असा सुमारे सलग २८ वर्षे आदर्श राज्यकारभार केला. त्यांनी त्यांचा दरबार सर्वसामान्यांसाठी कायम खुला ठेवला होता. प्रजेच्या तक्रारी थेट ऐकून त्यावर त्वरित निर्णय घेतला जात असे. आजच्या लोकसहभागी प्रशासन, ई-गव्हर्नन्स, जनसुनावणी आणि सामाजिक लेखापरीक्षण या संकल्पनांचा पाया त्यांच्या प्रशासनशैलीत दिसून येतो.महसूल व्यवस्थेत त्यांनी पारदर्शकता ठेवली. शेतकऱ्यांवरील अन्याय टाळण्यासाठी न्याय्य करपद्धती राबवली. दुष्काळ किंवा संकटाच्या काळात करमाफी देऊन प्रजेला दिलासा दिला. आजच्या काळात प्रशासनातील भ्रष्टाचार, विलंब आणि असंवेदनशीलता पाहता अहिल्यादेवींचे लोककेंद्री, संवेदनशील आणि उत्तरदायी प्रशासन अधिकच प्रेरणादायी वाटते. अहिल्यादेवी होळकर म्हणजे केवळ एक नाव नाही, तर सुशासनाची एक शाश्वत प्रणाली आहे. ज्यांनी आपला प्रभावशाली इतिहास निर्माण केला.O न्यायव्यवस्थेतील निष्पक्षता आणि तत्परता :अहिल्यादेवींची न्यायव्यवस्था अत्यंत सुलभ, त्वरित आणि निष्पक्ष होती. जाती, धर्म, लिंग किंवा सामाजिक स्तर यांचा भेद न करता त्यांनी सर्वांना समान न्याय दिला. कायद्यापुढे सर्व समान हे आधुनिक लोकशाहीचे तत्त्व त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून त्याकाळी जपले. न्याय आणि लोककल्याण ज्याचे ध्येय, तीच खरी राजसत्ता, असे अहिल्यादेवी होळकरांचे विचार होते. इतिहासात उल्लेख येतो की, अन्याय करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध त्यांनी स्वतःच्या नातलगांनाही माफ केले नाही. न्याय करताना, मी कोणाचीही मुलगी किंवा सून नाही, तर प्रजेची सेवक आहे, ही त्यांची भूमिका होती. आज न्यायालयांमधील प्रकरणांचा वाढता बोजा आणि न्याय मिळण्यातील विलंब पाहता, त्यांच्या त्वरित न्यायदानाच्या तत्त्वांचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे.समाजकल्याण आणि विकासाभिमुख दृष्टिकोनअहिल्यादेवींनी विकासाचा अर्थ केवळ आर्थिक प्रगती मानला नाही, तर समाजहित, पर्यावरण आणि सांस्कृतिक जतन यांचा समतोल राखला. त्यांनी देशभर मंदिरे, घाट, धर्मशाळा, विहिरी, तलाव आणि रस्ते बांधले. काशी, गया, सोमनाथ, रामेश्वरम यासारख्या तीर्थक्षेत्रांचा त्यांनी जीर्णोद्धार करून सांस्कृतिक एकात्मतेला चालना दिली.त्यांनी केलेले जलसंधारणाचे कार्य आजच्या शाश्वत विकास आणि ग्रीन इन्फ्रास्ट्रक्चरच्या संकल्पनांशी सुसंगत आहेत. विहिरी, बारव आणि तलावांची निर्मिती ही केवळ सुविधा नव्हती, तर भविष्यातील पर्यावरणीय संकटांची दूरदृष्टी होती.O आर्थिक नियोजन आणि आत्मनिर्भरतेचा आदर्श : अहिल्यादेवींचे आर्थिक धोरण हे प्रजेच्या समृद्धीवर आधारित होते. त्यांनी कापड उद्योग, शेती आणि व्यापाराला चालना दिली. व्यापाऱ्यांना सुरक्षित मार्ग, सुविधा आणि संरक्षण दिल्यामुळे इंदौर एक महत्त्वाची व्यापारी पेठ म्हणून उदयास आले. त्यांच्या आर्थिक धोरणातील तीन वैशिष्ट्ये म्हणजे राज्याचा निधी लोकहितासाठी वापरणे, कराचा बोजा न वाढवता व्यापार वृद्धिंगत करणे, स्वतःचे जीवन साधे ठेवून सार्वजनिक पैशाचा काटकसरीने वापर करणे. आजच्या युवकांसाठी हे आर्थिक व्यवस्थापनाचे सर्वोत्कृष्ट उदाहरणच म्हणावे लागेल. केवळ बचत नाही, तर कौशल्यविकास आणि उत्पादकतेत गुंतवणूक करण्याची शिकवण त्यांच्या कार्यातून दिसून येते.O सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि सर्वधर्मसमभाव : अहिल्यादेवींचा सांस्कृतिक दृष्टिकोन अत्यंत व्यापक होता. त्यांनी संपूर्ण भारतातील धार्मिक स्थळांचे पुनरुज्जीवन केले. हे कार्य केवळ धार्मिक नव्हते, तर भारतीय सांस्कृतिक अस्मितेचे जतन आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट करणारे होते.विशेष म्हणजे, त्यांनी केवळ हिंदू मंदिरांनाच नव्हे, तर मुस्लीम समाजाच्या धार्मिक कार्यांनाही मदत केली. यामुळे त्यांच्या सर्वधर्मसमभावी आणि समन्वयवादी दृष्टिकोनाचे दर्शन घडते.O स्त्री-सशक्तीकरणाची प्रेरणादायी प्रतिमा :पुरुषप्रधान व्यवस्थेत एक स्त्री म्हणून यशस्वी राज्यकारभार करणे ही अत्यंत मोठी कामगिरी होती. अहिल्यादेवींनी सिद्ध केले की नेतृत्वासाठी लिंग नव्हे, तर दूरदृष्टी, निर्णयक्षमता आणि संवेदनशीलता महत्त्वाची असते.त्यांनी विधवांना संपत्तीचे अधिकार दिले, स्त्रियांच्या सन्मानाचे रक्षण केले आणि सामाजिक चौकटींना आव्हान दिले. आजच्या महिला राजकारणी, प्रशासक आणि समाजकारणींसाठी त्या प्रेरणेचा अखंड स्त्रोत आहेत.O आजच्या काळातील प्रासंगिकता :आज भारत स्मार्ट सिटी, सुशासन, शाश्वत विकास आणि स्त्री-सशक्तीकरण यासारख्या संकल्पनांवर भर देत आहे. या सर्व मूल्यांची पायाभरणी अहिल्यादेवींनी २५९ वर्षांपूर्वीच केली होती. त्यांचे जीवन आजच्या युवकांसाठी आदर्शवत आहे. संकटातही धैर्याने कसे उभे राहावे, सामाजिक बांधिलकीची जपणूक कशी करावी, निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा जपणे, विकासात मानवी मूल्यांना प्राधान्य देणे. संकटांना संधीत रूपांतरित करणारी जिद्द म्हणजेच अहिल्यादेवींचा वारसा, जेव्हा सत्ता प्रजापालनाचे साधन बनते, तेव्हा राज्य रामराज्य होते. स्त्री-शक्तीचा विजय म्हणजे केवळ अधिकार मिळवणे नव्हे, तर समाजाला सक्षम नेतृत्वाची दिशा देणे होय. अहिल्यादेवी होळकर या केवळ इतिहासातील एक राणी नव्हत्या; तर त्या एक युगप्रवर्तक विचारवंत, लोकमाता, राजमाता आणि आदर्श शासनकर्त्या होत्या. त्यांच्या कार्यातून न्याय, समता, लोककल्याण, सांस्कृतिक अभिमान आणि स्त्री-सशक्तीकरण यांचे अद्वितीय दर्शन घडते. अहिल्यादेवी होळकर वयाच्या ७० व्या वर्षी म्हणजे १३ ऑगस्ट १७९५ मध्ये त्यांची प्राणज्योत मावळली. आज त्यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ अभिवादन नव्हे, तर त्यांच्या नैतिक मूल्यांचा स्वीकार करणे होय. पुतळे उभारण्यापेक्षा त्यांनी दाखविलेला लोककल्याणाचा मार्ग अनुसरणे. पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यापेक्षा, त्यांच्या लोककल्याणकारी विचारांचे पुष्प समाजमनात फुलवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अहिल्यादेवींचे जीवन हे इतिहासातील एक सुवर्णपान नसून आधुनिक भारताच्या जडणघडणीसाठी एक शाश्वत प्रेरणास्त्रोत आहे, असेच म्हणावे लागेल.



**डॉ. महेश मोटे**
मुरूम, ता. उमरगा, जि. धाराशिव.
भ्रमणध्वनी क्रमांक : ९९२२९४२३६२

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३१ मे २०२६


## प्रत्येकाने समजून घ्यावे

भोळा स्वभाव पाहून
सारेच का त्रास देतात ?
अचानक बोलताच,
मनाला लावून घेतात. १

भोळा स्वभाव पाहून,
जो तो बोलू लागतो.
आक्रमक होताच म्हणे,
हा उद्धट कसे वागतो. २

सहनशीलतेचा कधीही,
बांध फुटणार असते.
प्रत्येकाने समजून घ्यावे,
वाईट वागायचे नसते. ३

भोळा स्वभाव कधीही,
तोडत नाही कधी वायदा,
जीवनात जगतांना तो,
बघणार नाही फायदा. ४

भोळ्या स्वभावाचा तुम्ही,
कशाला घेता फायदा,
त्यालाही माहीत असते,
जगी जगण्याचा कायदा. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## कन्नड तालुक्यात बहरते साहित्यिक चळवळ



**मो**बाईल आणि सोशल मीडिया आला की वाचन संपलं, लेखन संपलं, अशी तक्रार नेहमी ऐकायला मिळते. पण कन्नड तालुक्यातील साहित्यिकांचा व्हॉट्सअप ग्रुप हा याला अपवाद आहे. इथे मोबाईलचा वापर करमणुकीसाठी नाही, तर विचार घडवण्यासाठी होतो आहे. आणि त्यातूनच गावपातळीवर एक साहित्यिक चळवळ उभी राहत आहे.या ग्रुपची सुरुवात जरी छोटी असली तरी आज त्यात 100 पेक्षा अधिक सभासद आहेत. विशेष म्हणजे हे सगळे एकाच क्षेत्रातील नाहीत. शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर, ॲड. कृष्णा जाधव, डॉ. अंबादास सगट, डॉ. रमेश सूर्यवंशी, प्रा. रंगनाथ लहाने, डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. संजय गायकवाड, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. रुपेश मोरे, डॉ. सिताराम जाधव, संजय जाधव, उत्तमराव राठोड, सागर जाधव, पी. एम. डहाके, आर. के. पवार, ग्रंथपाल प्रा. संतोष देशमुख यांसारखे ज्येष्ठ साहित्यिक, शिक्षक आणि प्राध्यापक यात आहेत. त्यांच्यासोबत वकील, तहसिलदार, इंजिनिअर, नोकरदार, शेतकरी, संस्थाचालक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, कवी, लेखक, पत्रकार आणि फक्त वाचक असले साहित्यप्रेमीही जोडले गेले आहेत. तालुक्यातील पत्रकारही साहित्यिक उपक्रमांना पाठबळ देत आहेत. वेगवेगळ्या वयाचे, व्यवसायाचे, अनुभवाचे लोक एकत्र आल्याने चर्चेला खोली आणि विविधता दोन्ही मिळते. हे सर्वजण ग्रुपमध्ये सहभागी होऊन नवोदितांना सातत्याने प्रेरणा देतात.या ग्रुपचा नियमच वेगळा आहे. इथे शुभेच्छा संदेश, राजकीय पोस्ट, विनोदी फोटो यांना जागा नाही. फक्त कविता, कथा, लघुलेख, समीक्षा आणि विचारप्रवर्तक लेख पोस्ट होतात. कुणी नवीन कविता टाकली की त्यावर लगेच प्रतिक्रिया येते. नवोदितासह ज्येष्ठ साहित्यिक एकत्र येतात आणि साहित्यावर चर्चा करतात. ही चर्चा लेखन वाचनासाठी उपयुक्त ठरते. कुठे भाषा घट्ट करायची आहे, कुठे विचार स्पष्ट करायचा आहे, कुठे अनुभवाची झळ कमी पडते आहे, हे सगळं मोकळेपणाने सांगितलं जातं. ही चर्चा नाव ठेवण्यासाठी नसते, तर लिहिणाऱ्याला अधिक चांगलं लिहायला लावण्यासाठी असते. त्यामुळे नवोदिताला इथेच पहिलं व्यासपीठ आणि पहिली दाद मिळते.या उपक्रमाला श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंहजी पवार यांचे मार्गदर्शन, प्रेरणा आणि सहकार्य मिळत आहे. त्यांच्या पाठिंब्यामुळे उपक्रमाला दिशा आणि स्थैर्य लाभलं आहे. तसेच सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून विविध कार्यक्रम होत आहेत. या वाचनालयाने लेखकांना प्रत्यक्ष व्यासपीठ उपलब्ध करून दिलं आहे, ज्यामुळे ऑनलाइन चर्चेला प्रत्यक्ष कृतीची जोड मिळाली आहे.त्रैमासिक तिफण आणि तिफण वाचक चळवळ ही संपूर्ण उपक्रमाला प्रेरणादायी ठरत आहे. शिवाजी महाविद्यालयाचा मराठी विभाग यांच्या पुढाकाराने सातत्याने विविध वाङ्‌मयीन उपक्रम सुरू आहेत. त्रैमासिक तिफणमध्ये नव्या-जुन्या लेखकांच्या कथा, कविता, लेख प्रसिद्ध होत आहेत. त्यामुळे लिहिणाऱ्याला व्यासपीठ मिळतं आणि वाचकाला दर्जेदार साहित्य मिळतं. नवोदित कवींना कविसंमेलनात संधी मिळते, ते मंचावर येतात, आपली रचना सादर करतात आणि हळूहळू नावारूपास येतात.डिजिटल चर्चा इथेच थांबत नाही. ग्रुपने ऑनलाइनच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष कार्यक्रमांची परंपरा सुरू केली आहे. दरवर्षी तिफण कविता महोत्सव होतो, ज्यात तालुकाभरातील कवी आपल्या रचना सादर करतात. नवोदित कवींना व ज्येष्ठ साहित्यिकांना येथे पुरस्कार देऊन गौरवले जाते. लेखक-वाचक मेळाव्यात पुस्तकांवर चर्चा होते, लेखक आपल्या लेखनामागचा अनुभव सांगतो आणि वाचक आपले प्रश्न विचारतो. स्नेहमेळावा आणि साहित्य संवाद यातून जुने-नवे लेखक एकमेकांच्या संपर्कात येतात. या कार्यक्रमांमुळे आतापर्यंत तालुक्यात हजारो कवींनी हजेरी लावली आहे. या कार्यक्रमांमुळे फक्त लिहिणारे घडत नाहीत, तर ऐकणारे आणि वाचणारेही घडतात. गावात वाचन संस्कृती रुजण्याचा हा पाया ठरतो आहे.या चळवळीचा परिणाम दिसून येऊ लागला आहे. कन्नड तालुका आता "कवितेचं गाव" म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. कन्नडची साहित्यिक ओळख आता महाराष्ट्रभर झाली आहे. अनेक नवोदित कवी-लेखकांना शासनाकडून अनुदान मिळालं आहे आणि त्यांच्या पुस्तकांचं प्रकाशन झालं आहे. ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थी कवीही आता कविता लिहू लागले आहेत. कवी ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, अरुण थोरात, प्रविण दाभाडे, समाधान निकम, संदीप वाकडे, संदीप ढाकणे, श्रीराम दापके, भरत सोनवणे, अजय दवंडे, प्रभत शेळके, अनिता राठोड, शुभदा देवरे, पुजा चव्हाण आदी कवी-कवयित्री सातत्याने लेखन करीत आहेत. जे मुलगा-मुलगी पूर्वी लिहूनही लपवून ठेवायचे, ते आज मंचावर उभं राहून आपली रचना वाचतात. शेतकऱ्याच्या मुलाने शेतीवर कविता लिहिली, शिक्षकाने वर्गातल्या अनुभवावर कथा लिहिली, हे सगळं या ग्रुपमुळेच शक्य झालं आहे.कन्नडच्या या उपक्रमातून एक गोष्ट स्पष्ट होते. माध्यम महत्त्वाचं नाही, उद्देश महत्त्वाचा आहे. मोबाईलचा वापर केला तर तो वेळ वाया घालवण्यासाठीही होऊ शकतो आणि विचारांची शेती करण्यासाठीही. कन्नडच्या साहित्यिकांनी दुसरा मार्ग निवडला आहे. त्यांनी दाखवून दिलं आहे की डिजिटल युगातही साहित्याची चळवळ जिवंत ठेवता येते, ती वाढवता येते आणि नव्या पिढीपर्यंत पोहोचवता येते.

आज जेव्हा सगळीकडे वाचन कमी होतंय, लिहिणं कमी होतंय, तेव्हा कन्नडचा हा प्रयोग आशा देतो. साहित्य फक्त ग्रंथालयात किंवा शहरातल्या सभागृहात राहू नये, ते गावातल्या शेतात, वर्गात, अंगणात पोहोचलं पाहिजे. आणि ते पोहोचवण्याचं काम कन्नडचा हा व्हॉट्सअप ग्रुप शांतपणे, पण सातत्याने करत आहे.

**डॉ. शिवाजी हुसे**
**संपादक - तिफण**


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३१ मे २०२६

# लोकमाता अहिल्यादेवी : विकास, संस्कृती आणि मानवतेचा संगम

अराजकतेच्या काळात उभा राहिलेला लोककल्याणाचा दीपस्तंभ) भारतीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचे मूल्यमापन केवळ त्यांच्या कार्यकाळाच्या चौकटीत करता येत नाही. काळ बदलतो, राजवटी बदलतात, व्यवस्थाही बदलतात; परंतु काही विचार शाश्वत ठरतात. लोकमाता अहिल्यादेवी होळकर हे असेच एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे जीवन आणि कार्य केवळ एका राज्याच्या कारभारापुरते मर्यादित नसून भारतीय समाजजीवनातील विकास, संस्कृती, लोककल्याण, स्त्री नेतृत्व आणि मानवतेच्या सर्वोच्च मूल्यांचे प्रतिनिधित्व करणारे आहे.आज आपण विकसित भारत, सुशासन, महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक पुनर्जागरण याविषयी चर्चा करतो. परंतु अठराव्या शतकातच या सर्व मूल्यांची यशस्वी अंमलबजावणी करून दाखवणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे अहिल्यादेवी होळकर होय.तत्कालीन भारत : अस्थिरतेचे युग अहिल्यादेवींच्या कार्याचे महत्त्व समजून घेण्यासाठी त्या काळातील परिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे.सन १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला आणि त्यानंतर मुघल साम्राज्याची पकड सैल होऊ लागली. दिल्लीतील केंद्रीय सत्ता दुर्बल होत होती. देशभरात अनेक प्रादेशिक शक्ती उदयास येत होत्या. मराठा साम्राज्य विस्तारत होते; परंतु त्याचबरोबर सतत युद्धे, राजकीय संघर्ष आणि सत्तास्पर्धा सुरू होत्या. उत्तर भारतात अफगाण आक्रमणे होत होती. नादिरशाह आणि अहमदशाह अब्दाली यांच्या हल्ल्यांनी देशाची आर्थिक आणि सामाजिक घडी विस्कटली होती. व्यापारमार्ग असुरक्षित झाले होते. अनेक शहरे उद्ध्वस्त झाली होती. सामान्य जनतेमध्ये असुरक्षिततेचे वातावरण होते. याच काळात मराठा साम्राज्याच्या माध्यमातून भारतीय राजकीय शक्ती उभी राहत होती. परंतु साम्राज्य विस्ताराइतकेच महत्त्वाचे काम म्हणजे प्रशासन स्थिर करणे, लोकांचा विश्वास टिकवणे आणि आर्थिक पुनर्बांधणी करणे होते. अशा अस्थिर काळात अहिल्यादेवी होळकर यांनी मालव्याच्या भूमीत स्थैर्य, विकास आणि लोककल्याणाचा आदर्श निर्माण केला.चौंडीपासून महेश्वरपर्यंत इ.स. १७२५ मध्ये महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी येथे त्यांचा जन्म झाला. माणकोजी शिंदे यांच्या घरात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे बालपण साधेपणात गेले. त्या काळात मुलींच्या शिक्षणाला विशेष महत्त्व नव्हते. परंतु त्यांना धार्मिक, नैतिक आणि सामाजिक मूल्यांचे संस्कार मिळाले.मल्हारराव होळकर यांनी त्यांच्या गुणांची दखल घेत त्यांचा विवाह आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी लावून दिला. यानंतर त्या होळकर घराण्याचा भाग बनल्या. परंतु नियतीने त्यांच्यासमोर मोठी आव्हाने उभी केली. १७५४ मध्ये खंडेरावांचा मृत्यू झाला. त्या काळातील सामाजिक प्रथेनुसार सती जाण्याचा दबाव होता. परंतु मल्हाररावांनी त्यांना थांबवले. ही घटना भारतीय इतिहासातील महत्त्वाच्या वळणांपैकी एक मानली जाते. कारण याच निर्णयामुळे पुढे भारताला लोकमाता अहिल्यादेवी मिळाल्या.दुःखातून घडलेले नेतृत्व अहिल्यादेवींना एकामागोमाग अनेक वैयक्तिक आघात सहन करावे लागले. पतीचे निधन, सासरे मल्हाररावांचे निधन आणि पुत्र मालेराव यांचा मृत्यू—या घटनांनी कोणतेही कुटुंब उद्ध्वस्त झाले असते. परंतु अहिल्यादेवींनी व्यक्तिगत दुःखाला सार्वजनिक सेवेत रूपांतरित केले. त्यांनी सत्ता ही वैभवाची नव्हे तर जबाबदारीची गोष्ट मानली. आजच्या काळात नेतृत्वाबद्दल चर्चा होते. परंतु नेतृत्व म्हणजे संकटात स्थिर राहणे, वैयक्तिक हितापेक्षा सार्वजनिक हिताला प्राधान्य देणे आणि समाजासाठी निर्णय घेणे—हे अहिल्यादेवींनी कृतीतून दाखवून दिले.राज्यकारभारातील लोकाभिमुखता अहिल्यादेवींच्या प्रशासनाचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्यांची जनतेशी असलेली थेट नाळ. त्यांच्या दरबारात सामान्य माणसालाही प्रवेश होता. प्रजेच्या तक्रारी ऐकण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था होती. न्यायदानात कोणताही भेदभाव केला जात नव्हता. त्या काळातील अनेक राजसत्तांमध्ये राजा आणि जनता यांच्यात मोठे अंतर होते. परंतु अहिल्यादेवींनी हे अंतर कमी केले. आज लोकशाहीतही प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवादाचा अभाव जाणवतो. अशा परिस्थितीत अहिल्यादेवींचा लोकसंपर्काचा आदर्श अत्यंत महत्त्वाचा ठरतो.विकासाचा मानवी दृष्टिकोन अठराव्या शतकातील भारत युद्धे आणि राजकीय संघर्षांमुळे आर्थिकदृष्ट्या कमकुवत होत होता. अशा काळात अनेक शासकांनी लष्करी विस्तारावर भर दिला. अहिल्यादेवींनी मात्र लोककल्याणावर भर दिला.त्यांनी:* विहिरी बांधल्या* तलाव उभारले* रस्ते विकसित केले* घाट बांधले* धर्मशाळा उभारल्या* यात्रेकरूंसाठी सुविधा निर्माण केल्याआज विकासाची चर्चा मोठ्या प्रकल्पांभोवती फिरते. परंतु विकासाचा अंतिम उद्देश माणसाचे जीवन अधिक सुसह्य करणे हा असतो. हा विचार अहिल्यादेवींच्या कार्यात स्पष्ट दिसतो.महेश्वर : आदर्श प्रशासनाचे केंद्र अहिल्यादेवींनी महेश्वरला आपली राजधानी बनवले. महेश्वर हे केवळ राजकीय केंद्र नव्हते; ते आर्थिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक केंद्र बनले. हस्तकला, विणकाम आणि व्यापाराला त्यांनी प्रोत्साहन दिले. आज प्रसिद्ध असलेल्या महेश्वरी साड्यांच्या परंपरेला त्यांच्या काळात चालना मिळाली. स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देऊन रोजगारनिर्मिती कशी करता येते याचे उदाहरण त्यांनी दिले. आजच्या "आत्मनिर्भर भारत" संकल्पनेची बीजे त्या काळातच त्यांच्या कार्यात दिसून येतात.निष्कर्ष अहिल्यादेवी होळकर यांचे व्यक्तिमत्त्व समजून घेताना केवळ त्यांचे धार्मिक किंवा सांस्कृतिक कार्य पाहून चालणार नाही. त्या अराजकतेच्या काळात स्थैर्य निर्माण करणाऱ्या, युद्धाच्या काळात विकास घडविणाऱ्या, पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्री नेतृत्व सिद्ध करणाऱ्या आणि सत्तेला मानवतेची दिशा देणाऱ्या लोकमाता होत्या. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ इतिहासाला अभिवादन करणे नव्हे; तर वर्तमान आणि भविष्याला दिशा देणाऱ्या मूल्यांचे पुनर्स्मरण करणे होय.



लेखक प्रा डॉ नामदेव वैजनाथ कचरे
संपर्क:९८८१२१४४००



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३१ मे २०२६


# विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा सारथी : आदरणीय सतीश पाटील सर



**"झेलने पडते हैं तप्ते हुए मौसम के सितम,**
**लोग आसान समझते हैं शजर हो जाना."**
**- अहमद औरंगाबादी**

एखादे झाड दिसायला स्थिर आणि भक्कम वाटते; परंतु त्या स्थैर्यामागे उन्हाचे चटके, वादळांचे तडाखे आणि ऋतूंचे असंख्य आघात सहन करण्याची क्षमता दडलेली असते. शिक्षकाचे आयुष्यही काहीसे असेच असते. समाजाला त्याच्या कार्याचे फळ दिसते, पण त्या फळामागील त्याग, संघर्ष, संयम आणि सातत्य फारसे दिसून येत नाही.जय हिंद विद्यालय, बाभुळगाव येथील आदरणीय सतीश पाटील सर यांच्या ३५ वर्षांच्या सेवेकडे पाहताना हीच भावना मनात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवताना त्यांनी केवळ शिक्षकाची भूमिका निभावली नाही, तर अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याच्या प्रवासात मार्गदर्शक, पालक आणि प्रेरणास्रोत म्हणून काम केले. विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखून तिला योग्य दिशा देणे, शिस्तीची जाणीव निर्माण करणे आणि कष्टाचे महत्त्व पटवून देणे हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य राहिले.आज त्यांच्या सेवानिवृत्तीचा प्रसंग समोर असताना हा केवळ एका कर्मचाऱ्याच्या सेवासमाप्तीचा दिवस वाटत नाही. एका पिढीने आपल्या जडणघडणीत ज्यांचे योगदान अनुभवले, अशा शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा क्षण आहे. त्यामुळे हा सोहळा केवळ गौरवाचा नसून आठवणी, संस्कार आणि ऋणानुबंधांचा उत्सव ठरतो.> " लेकुराचे हित वाहे माऊलीचे चित्त । ऐसी कळवळ्याची जाती करी लाभाविण प्रीती ॥" आई ज्या निःस्वार्थ भावनेने आपल्या लेकरांच्या कल्याणाचा विचार करते, त्याच भावनेने पाटील सरांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार केला. विद्यार्थ्यांचे यश, त्यांची प्रगती आणि त्यांचे उज्ज्वल आयुष्य हेच त्यांच्या कार्याचे खरे ध्येय होते.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अडचणी त्यांना जवळून माहीत होत्या. आर्थिक मर्यादा, साधनसामग्रीचा अभाव आणि संधींची कमतरता यांमुळे अनेक विद्यार्थ्यांची स्वप्ने अपूर्ण राहू शकतात, याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी शिक्षकाची भूमिका वर्गखोली आणि क्रीडांगणापुरती मर्यादित ठेवली नाही. विद्यार्थ्यांमध्ये दडलेली क्षमता शोधून तिला योग्य दिशा देण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले.एखादा विद्यार्थी खेळात मागे पडत असेल तर त्याला प्रोत्साहन देणे, निराश झालेल्या विद्यार्थ्याच्या पाठीवर विश्वासाचा हात ठेवणे, त्याच्या कुटुंबीयांशी संवाद साधणे आणि त्याला नव्याने उभारी देणे हे त्यांच्या दैनंदिन कार्याचा भाग होता. विद्यार्थ्यांना केवळ स्पर्धा जिंकण्याचे नव्हे, तर आयुष्य जिंकण्याचे धडे त्यांनी दिले.आज विविध क्षेत्रांत यशस्वी झालेल्या अनेक विद्यार्थ्यांच्या यशामागे पाटील सरांचे मार्गदर्शन, शिस्त आणि संस्कार उभे आहेत. त्यांच्या विद्यार्थ्यांनी केवळ पदके आणि पारितोषिके मिळवली नाहीत, तर समाजात आदर्श नागरिक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. हीच त्यांच्या कार्याची खरी कमाई आणि त्यांच्या तपश्चर्येची फलश्रुती आहे.ग्रामीण भागात शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना कोणकोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो, याची सतीश पाटील सरांना सखोल जाणीव होती. कारण त्यांनी केवळ शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांकडे पाहिले नाही, तर त्यांच्या कौटुंबिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीलाही समजून घेतले. गावातील अनेक विद्यार्थी शेतकरी आणि कष्टकरी कुटुंबांतून येत होते. त्यांच्या डोळ्यांत मोठी स्वप्ने होती; पण त्या स्वप्नांना साकार करण्यासाठी आवश्यक साधने आणि संधी मात्र मर्यादित होत्या.क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्याची क्षमता असूनही अनेक विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे मागे पडत असल्याचे चित्र त्यांनी जवळून पाहिले. काही विद्यार्थ्यांकडे खेळासाठी आवश्यक बूट नव्हते, काहींकडे क्रीडा साहित्य नव्हते, तर काहींना स्पर्धेसाठी बाहेरगावी जाण्याचा खर्च परवडत नव्हता. अशा वेळी पाटील सरांनी केवळ सहानुभूती व्यक्त केली नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहिले.अनेक प्रसंगी त्यांनी स्वतःच्या खिशातून विद्यार्थ्यांसाठी क्रीडा साहित्य खरेदी केले, ड्रेस उपलब्ध करून दिले, स्पर्धांसाठी प्रवास खर्च दिला आणि त्यांच्या आहाराचीही काळजी घेतली. काही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक फीची व्यवस्था करून त्यांचे शिक्षण खंडित होऊ दिले नाही. विद्यार्थ्यांच्या यशासाठी आवश्यक असलेली प्रत्येक बाब त्यांनी आपल्या जबाबदारीचा भाग मानली.त्यांच्या दृष्टीने विद्यार्थी हा केवळ शाळेतील क्रमांक किंवा उपस्थितीपत्रकावरील नाव नव्हता. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये दडलेल्या गुणवत्तेवर त्यांचा विश्वास होता. त्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्नांना त्यांनी स्वतःचे स्वप्न मानले आणि ती स्वप्ने पूर्ण होताना पाहणे हेच आपल्या आयुष्याचे समाधान समजले.सतीश पाटील सरांचे कार्य केवळ क्रीडांगणापुरते मर्यादित नव्हते. ते विद्यार्थ्यांना धावणे, खेळणे किंवा स्पर्धा जिंकणे शिकवत होतेच; पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे ते त्यांना आयुष्य जगण्याची कला शिकवत होते. मैदानावर घाम गाळताना त्यांनी विद्यार्थ्यांना मेहनतीचे महत्त्व पटवून दिले, तर पराभवाच्या प्रसंगी खचून न जाता पुन्हा नव्या जोमाने उभे राहण्याची मानसिक ताकद दिली.त्यांच्या दृष्टीने प्रत्येक स्पर्धा ही केवळ पदक मिळवण्याची संधी नव्हती; ती विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची प्रयोगशाळा होती. जिंकताना नम्र राहणे आणि हरताना संयम राखणे, संघात काम करताना इतरांचा आदर करणे, नियमांचे पालन करणे, प्रामाणिकपणे प्रयत्न करणे आणि कोणत्याही परिस्थितीत हार न मानणे हे जीवनमूल्य त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात रुजवले.पाटील सरांच्या शिट्टीचा आवाज केवळ मैदानावर सराव सुरू होण्याचा संकेत नव्हता; तो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शिस्त, वेळेचे महत्त्व आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा संदेश होता. अनेक विद्यार्थ्यांसाठी ते शिक्षकापेक्षा अधिक काही होते—मार्गदर्शक, सल्लागार आणि प्रसंगी पालकाची भूमिकाही ते निभावत असत.आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी पोलीस दल, सैन्य, शासकीय सेवा, शिक्षण, वैद्यकीय, अभियांत्रिकी, उद्योग आणि कृषी क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत आहेत. या विद्यार्थ्यांच्या यशामध्ये त्यांच्या स्वतःच्या मेहनतीबरोबरच पाटील सरांनी दिलेली शिस्त, जिद्द, आत्मविश्वास आणि संस्कार यांचाही मोठा वाटा आहे.एखादा शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना किती घडवू शकतो याचे मूर्त उदाहरण म्हणजे सतीश पाटील सर. त्यांनी केवळ खेळाडू निर्माण केले नाहीत, तर संकटांना सामोरे जाणारे, कर्तव्यनिष्ठ, समाजाभिमुख आणि मूल्यनिष्ठ नागरिक घडवले. म्हणूनच त्यांचे योगदान हे केवळ क्रीडा शिक्षक म्हणून नव्हे, तर एका संपूर्ण पिढीच्या आयुष्याला दिशा देणाऱ्या मार्गदर्शक म्हणून कायम स्मरणात राहीलमी स्वतः १९९६ च्या बॅचचा विद्यार्थी. आजही शालेय जीवनाच्या आठवणी जाग्या झाल्या की जय हिंद विद्यालयातील दोन व्यक्तिमत्त्वे विशेषत्वाने डोळ्यांसमोर उभी राहतात—त्रिभुवन सर आणि सतीश पाटील सर. त्या काळात विद्यार्थ्यांच्या मनात या दोघांविषयी आदरयुक्त भीती होती. वर्गामध्ये त्रिभुवन सरांचा दरारा आणि वर्गाबाहेर पाटील सरांचा दरारा अशीच आमची समजूत होती.सकाळच्या प्रार्थनेसाठी उशीर झाला की पाटील सर शाळेच्या गेटवर उभे असत. त्यांच्या हातातील छडी आणि चेहऱ्यावरील गंभीर भाव पाहिले की उशिरा आलेल्या विद्यार्थ्यांची धडधड वाढायची. त्यावेळी आम्हाला वाटायचे की सर खूप कठोर आहेत. शिस्तीबाबत कोणतीही तडजोड न करणारे, नियमांचे काटेकोर पालन करणारे आणि विद्यार्थ्यांकडूनही त्याच अपेक्षा ठेवणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आमच्या मनात कोरले गेले होते.मात्र, काळ पुढे सरकत गेला आणि आम्ही विद्यार्थीदशेतून आयुष्याच्या विविध टप्प्यांवर पोहोचलो. तेव्हा त्या कठोरतेमागील खरी भावना समजू लागली. विद्यार्थ्यांवर रागावणारा तो शिक्षक प्रत्यक्षात त्यांच्या भविष्याबद्दल चिंतित असलेला एक संवेदनशील पालक होता. शिस्त लावण्यामागे शिक्षा करण्याची भावना नव्हती, तर विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवण्याची तळमळ होती.आज मागे वळून पाहताना एक शेर नकळत आठवतो—"पत्थर मुझे कहता है मेरा चाहने वाला,मैं मोम हूँ उसने मुझे छू कर नहीं देखा."या ओळी जणू पाटील सरांच्या व्यक्तिमत्त्वाचेच वर्णन करतात. बाहेरून कठोर वाटणाऱ्या त्या व्यक्तिमत्त्वाच्या अंतरंगात विद्यार्थ्यांविषयी अपार प्रेम, जिव्हाळा आणि माया दडलेली होती. एखादा विद्यार्थी अडचणीत असेल तर त्याच्या मदतीला धावून जाणारे, त्याच्या यशासाठी झटणारे आणि त्याच्या अपयशाने मनोमन व्यथित होणारे सर आम्ही नंतर अनुभवले.शिक्षक म्हणून त्यांनी आम्हाला शिस्त दिली; पण त्याचबरोबर माणुसकीही शिकवली. कठोरतेच्या आवरणाआड दडलेली त्यांची माया हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख होती. म्हणूनच आजही त्यांच्या आठवणी काढताना मनात भीती नव्हे, तर कृतज्ञतेची आणि आदराची भावना दाटून येते.माणूस कोणतेही काम करत असताना त्यामध्ये किती आत्मीयता आणि समर्पण ओततो, यावर त्याच्या कार्याचे मूल्य ठरत असते. असे म्हणतात की, जो माणूस केवळ हाताचा वापर करतो तो कामगार असतो; जो हात आणि डोक्याचा वापर करतो तो कारागीर असतो; परंतु जो हात, डोके आणि हृदय या तिन्हींचा वापर करतो तो खरा कलाकार असतो.या अर्थाने पाहिले तर सतीश पाटील सर हे केवळ शिक्षक नव्हते, तर शिक्षण क्षेत्रातील एक कलावंत होते. कारण त्यांनी अध्यापन आणि क्रीडा प्रशिक्षणाला केवळ उपजीविकेचे साधन मानले नाही. त्यांनी त्याला एक ध्येय, एक व्रत आणि एक जीवनसाधना मानली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करणे, त्यांच्या अंगी सुप्त गुणांना वाव देणे आणि त्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी तयार करणे, हेच त्यांच्या कार्याचे खरे उद्दिष्ट होते.क्रीडांगणावर विद्यार्थ्यांचा सराव घेताना, स्पर्धांसाठी त्यांना तयार करताना किंवा त्यांच्या अडचणी समजून घेताना त्यांनी नेहमी मनापासून सहभाग घेतला. विद्यार्थ्यांचे यश पाहून त्यांना जे समाधान मिळत असे, ते कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठे होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास आणि त्यांच्या यशाची बातमी हीच त्यांच्यासाठी खरी कमाई होती.त्यांच्या व्यक्तिमत्त्वात श्रद्धा होती, कार्याप्रती समर्पण होते, जबाबदारीची जाणीव होती आणि विद्यार्थ्यांविषयी अपार आत्मीयता होती. शिस्तप्रियता, सचोटी, वक्तशीरपणा, दातृत्व, नेतृत्वगुण, निर्व्यसनता आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांनी त्यांचे जीवन समृद्ध झाले होते. त्यांनी केवळ या मूल्यांचा उपदेश केला नाही, तर स्वतःच्या आचरणातून त्यांचे उदाहरण विद्यार्थ्यांसमोर ठेवले.आज त्यांच्या कार्याचा मागोवा घेताना असे जाणवते की, त्यांनी घडवलेले विद्यार्थी हीच त्यांच्या जीवनकलेची उत्कृष्ट निर्मिती आहे. एखादा शिल्पकार जसा दगडातून सुंदर मूर्ती घडवतो, त्याचप्रमाणे पाटील सरांनी सामान्य विद्यार्थ्यांमधील असामान्य क्षमता ओळखून त्यांना घडवले. म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व एका शिक्षकापेक्षा अधिक उंचीचे वाटते—ते एक कलावंत शिक्षक होते, ज्यांनी आपल्या कार्यातून असंख्य आयुष्यांना आकार दिला.दिनांक ३१ मे २०२६ हा दिवस बाभुळगावच्या इतिहासात एका संस्मरणीय आणि भावनिक क्षणाचा साक्षीदार ठरत आहे. जय हिंद विद्यालयाचे ज्येष्ठ क्रीडा शिक्षक आदरणीय सतीश पाटील सर यांच्या सेवागौरव सोहळ्याच्या निमित्ताने आज संपूर्ण गाव कृतज्ञतेच्या भावनेने एकवटले आहे. हा केवळ एका शिक्षकाच्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम नसून, एका संपूर्ण पिढीने आपल्या गुरूप्रती व्यक्त केलेल्या आदर, प्रेम आणि ऋणनिर्देशाचा उत्सव आहे.गेल्या ३३ वर्षांत पाटील सरांच्या मार्गदर्शनाखाली घडलेल्या विविध बॅचेसमधील विद्यार्थी आज पुन्हा एकदा आपल्या शाळेच्या प्रांगणात एकत्र आले आहेत. अनेक जण नोकरी, व्यवसाय आणि विविध कारणांनी देशाच्या कानाकोपऱ्यात विखुरले असले, तरी आपल्या गुरूंच्या गौरवासाठी ते आवर्जून बाभुळगावात दाखल झाले आहेत. त्यांच्या उपस्थितीत जुन्या आठवणींना उजाळा मिळत आहे आणि शाळेच्या परिसरात पुन्हा एकदा त्या सुवर्णकाळाचे वातावरण निर्माण झाले आहे.सपत्नीक पाटील सरांची भव्य रथातून मिरवणूक, ढोल-ताशे, बँड-बाजा, फेट्यांची शान, गावजेवण आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण बाभुळगाव एका लोकोत्सवासारखे सजले आहे. मात्र या सोहळ्याचे खरे वैभव रथ, फेटे किंवा सजावटीत नसून विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील कृतज्ञतेत आणि गावकऱ्यांच्या मनातील आदरभावात आहे.आज प्रत्येकाच्या ओठांवर पाटील सरांविषयीच्या आठवणी आहेत. कोणाला त्यांच्या शिस्तीची आठवण येत आहे, कोणाला मैदानावरील मार्गदर्शनाची, तर कोणाला संकटाच्या काळात मिळालेल्या त्यांच्या आधाराची. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ सन्मानाचा सोहळा राहत नाही; तो भावना, आठवणी आणि ऋणानुबंधांचा एक जिवंत दस्तावेज बनतो.अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू . कारण आज पदावरून निवृत्त होणारी व्यक्ती ही केवळ एक शिक्षक नाही, तर अनेकांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. शाळेच्या इतिहासात, विद्यार्थ्यांच्या स्मृतीत आणि बाभुळगावच्या सामाजिक जीवनात ज्यांनी आपली अमिट छाप सोडली, अशा गुरुवर्यांचा गौरव करण्यासाठी संपूर्ण गाव एकत्र येणार आहे.शाळा ही केवळ विटा, सिमेंट आणि चार भिंतींनी उभी राहिलेली इमारत नसते. ती असते असंख्य आठवणींचे घर, संस्कारांचे विद्यापीठ आणि अनेक आयुष्यांना दिशा देणारे पवित्र स्थान. त्या शाळेच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांच्याशिवाय संस्थेची ओळखच अपुरी वाटते. जय हिंद विद्यालयासाठी सतीश पाटील सर हे असेच एक व्यक्तिमत्त्व आहे.गेली ३५ वर्षे त्यांनी या संस्थेच्या क्रीडांगणाला, विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आणि शाळेच्या संस्कारपरंपरेला समृद्ध केले. आज ते औपचारिकरीत्या सेवेतून निवृत्त होत असले तरी त्यांच्या कार्याची छाप शाळेच्या प्रत्येक कोपऱ्यात जिवंत आहे. आजही शाळेच्या मैदानावर नजर फिरवली की त्यांच्या शिट्टीचा आवाज कानात घुमल्याचा भास होतो. सकाळच्या प्रार्थनेच्या रांगा पाहिल्या की त्यांनी दिलेली शिस्त आठवते. विद्यार्थ्यांचे यश, त्यांचा आत्मविश्वास आणि त्यांची कर्तृत्वगाथा पाहिली की पाटील सरांनी रुजवलेले संस्कार जाणवतात.खरे तर शिक्षकाचे आयुष्य हे त्याच्या सेवापुस्तकातील नोंदींनी मोजले जात नाही. त्याने घडवलेल्या विद्यार्थ्यांच्या आयुष्यांतून त्याचे कार्य पुढे चालत राहते. शासकीय नियमानुसार सेवानिवृत्तीची तारीख येते, पदाची जबाबदारी संपते; पण शिक्षक म्हणून केलेले कार्य, दिलेले संस्कार आणि निर्माण केलेले ऋणानुबंध कधीच संपत नाहीत.आज विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत असलेले असंख्य विद्यार्थी हेच पाटील सरांच्या आयुष्यभराच्या तपश्चर्येचे जिवंत पुरावे आहेत. पोलीस दलातील अधिकारी, सैन्यातील जवान, शिक्षक, डॉक्टर, अभियंते, उद्योजक, शेतकरी आणि समाजाच्या विविध क्षेत्रांत आपले योगदान देणारे अनेक विद्यार्थी हे त्यांच्या कार्याचे चालते-बोलते स्मारक आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशामध्ये त्यांच्या मार्गदर्शनाचा, शिस्तीचा आणि प्रेरणेचा एक अंश निश्चितच सामावलेला आहे.आजचा दिवस आनंदाचा आहे, कारण एका कर्तृत्ववान शिक्षकाच्या कार्याचा गौरव होत आहे; पण त्याचवेळी तो हळव्या भावनांचाही आहे. कारण ज्यांनी आयुष्यभर विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी स्वतःला झोकून दिले, अशा गुरुवर्यांचा दैनंदिन सहवास आता शाळेला लाभणार नाही. तरीही त्यांच्या आठवणी, त्यांचे विचार आणि त्यांचे संस्कार पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहतील. आदरणीय सतीश पाटील सर हे आमच्यासाठी केवळ शिक्षक नाहीत; ते आमच्या स्वप्नांचे सारथी, आमच्या व्यक्तिमत्त्वाचे शिल्पकार आणि आमच्या आयुष्याचे मार्गदर्शक दीपस्तंभ आहेत. त्यांच्या कार्याला सलाम!




**प्रा. डॉ. शेख आरिफ ताजुद्दीन**
**मो. 7020268471**